॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमालेतंर्गत उदया मंगळवार, दि.११ सप्टेंबर रोजी सुप्रसिध्द लेखक श्री.नरेंद्र लांजेवार (बुलडाणा) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

कर्मवीर व्यंकटराव रणधीर प्रतिष्ठान, शिरपूर यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. उदया मंगळवारी सकाळी ११.३० वाजता सामाजिकशास्त्रे प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे श्री.लांजेवार हे ‘ या प्रश्नांचे करायचे काय ’ या विषयावर व्याख्यान देणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव भ.भा.पाटील राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले आहे.

-----

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेतंर्गत असलेल्या स्वामी विवेकानंद अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने मंगळवार, दि. ११ सप्टेंबर रोजी निवृत्त मे.जनरल डॉ.जी.डी.बक्षी यांचे `भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने, विशेष संदर्भ सीमेपलिकडील दहशतवाद` या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे राहतील. `भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील समकालीन आव्हाने` तसेच `भारताची दहशतवाद विरोधात असणारी संरक्षण यंत्रणा ` या विषयावर डॉ.बक्षी हे आपले मत मांडणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे व केंद्राचे विभागप्रमुख प्रा.आर.बी.गोरे यांनी केले आहे.

-----

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शनिवार, दि.८ सप्टेंबर रोजी वित्त विभागाच्या वतीने `वित्तीय साक्षरता` या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर होते. मंचावर स्टेट बँक ऑफ इंडियाचे सहायक महाप्रबंधक अशोन सोनूने, कुलसचिव भ.भा.पाटील, वित्त व लेखा अधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड, उपवित्त लेखा अधिकारी एस.आर.गोहिल उपस्थित होते. यावेळी श्री.सोनूने तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे अधिकारी संतोष सिन्हा, रुपाली पंडीत, श्री.पांडे यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रास्ताविक कुलसचिव पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.मुनाफ शेख यांनी केले. श्री.गोहिल यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक :10 सप्टेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी